# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०७१४/२१/अ.क्र.५८१४/२४/०१**

**श्री. अनिल राजाराम कांबळे**
एम-८१, मरिअम्मा नगर, डॉ.ए.बी.रोड, वरळी,
मुंबई-४०० ०१८.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत प्रस्ताव) प.उ.**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) प.उ.-१ यांचे कार्यालय,
हिंदूहृदय सम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे मंडई, ऑप जे.व्ही.एल.आर. पूनम नगर,
जोगेश्वरी (पूर्व) मुंबई – ४०००९३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) प.उ.**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) प.उ.-१ यांचे कार्यालय,
हिंदूहृदय सम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे मंडई, ऑप जे.व्ही.एल.आर. पूनम नगर,
जोगेश्वरी (पूर्व) मुंबई – ४०००९३.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.१२.२०२४</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित. ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०९.१२.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०५.११.२०२० | - | २१.१२.२०२० | - |

अपिलकर्तांनी दि.१६.०२.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. ०५.११.२०२० अन्वये "रेड पाल्म रेसिडेन्सी व रेड जीम, गुरु गोबिंदसिंग मार्ग, खार रेल्वे स्थानका जवळ, खार (प.) मुंबई – ४०००५२ येथील सी.टी.एस./प्लॉट नं. ८४०,८३३ सी. ८५३ सी या जमिनीवर इमारत बांधकाम करण्याकरिता देण्यात आलेले परवाने यांच्या कागदोपत्री प्रती मिळण्याबाबत मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी उत्तर न दिल्याने प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. १६.०२.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) प.उ.१ श्रीमती कृपा बक्षी उपस्थित आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) प.उ.१ श्रीमती कृपा बक्षी यांनी अपीलार्थी यांचे दि. २७.११.२०२४ रोजी स्वाक्षरी केलेल्याचे पत्र आयोगास सादर केले, सदर पत्रात अपीलार्थी यांना माहिती प्राप्त असल्याची नोंद आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना माहिती दिली आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक :२६.१२.२०२४**